# मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
# सामान्य मूळ दिवाणी अधिकारिता
# अपील (एल) क्र. 81-2020 मध्ये
# अंतरिम अर्ज क्रमांक – 1626/2020

इराण इस्लामिक रिपब्लिक
(मार्फत इराणीयन इस्लामिक
रिपब्लिक रेल्वे, तेहरान, इराण) … … … … अर्जदार/अपीलकर्ता
मूळ प्रतिवादी क्रमांक- 1

च्या विषयी … … … … … … .

इराण इस्लामिक रिपब्लिक
(मार्फत इराणीयन इस्लामिक
रिपब्लिक रेल्वे, तेहरान, इराण) ….. … .. अपीलकर्ता /
मूळ प्रतिवादी क्रमांक- 1

**- विरुद्ध -**

के. टी. स्टील इंडस्ट्रीज एलएलपी
भागीदारी कंपनी,
**पत्ता** - कार्यालय क्रमांक 208,
शिव स्मृती चेंबर्स,
दुसरा मजला, 49 ए,
डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी
मुंबई - 400 018 … … … उत्तरवादी क्रमांक- 1/
मूळ वादी

2. भारतीय राज्य व्यापार महामंडळ
प्रायव्हेट लिमिटेड,
भारत सरकारच्या मालकीची कंपनी
कंपनी कायदा, 1956 अन्वये
विधीसंस्थापित नोंदणीकृत कार्यालय
चंद्रलोक, 36 जनपथ,
नवी दिल्ली आणि शाखा कार्यालय
एअर इंडिया बिल्डिंग,
नरीमन पॉइंट, मुंबई ….. … .. उत्तरवादी क्रमांक- 2 /
मूळ प्रतिवादी क्रमांक- 2

* * * * *

रेल्वे ऑफ इस्लामी रिपब्लिक ऑफ इराण (आरएआय) करिता श्री आशिष कामत, वरिष्ठ वकील सोबत आशुतोष भडंग, मो.रेहान खान अन्सारी आय/बी. सईद अख्तर

प्रतिवादी क्र. 1 करिता श्री शरण जगतियानी, वरिष्ठ वकील सोबत विशाल नरिचानिया, राहुल जैन, आकृती शिर्हा आय/बी. एचएसए ऍडव्होकेट्स.

* * * * *

**कोरमः सन्मा. न्यायमूर्ति के. आर. श्रीराम आणि**
**सन्मा. न्यायमूर्ति राजेश एस. पाटील**
**निकाल राखून ठेवला :27 फेब्रुवारी, 2023**
**निकाल जाहीर:10 मार्च 2023**
**न्यायनिर्णय – (के. आर. श्रीराम, जे):**

1. सुरुवातीला कामत यांनी आपण 'द रेल्वे ऑफ द इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण' (RAI) नावाच्या संस्थेची बाजू मांडत असल्याचे सांगितले. हे त्यांनी अनेकदा स्पष्ट केले आहे.

2. अपील दाखल करण्यास 12 वर्षांपेक्षा जास्त विलंब झाल्यामुळे विलंब माफीसाठी हा अर्ज आहे.

3. अर्जदार हा इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण आहे, ज्याने रेल्वे वॅगन खरेदीसाठी जागतिक निविदा काढली होती. संबंधित वेळी, भारत सरकारने राज्य व्यापार महामंडळाच्या माध्यमातून रेल्वे वॅगनची निर्यात कॅनलाईज केली होती, जो उत्तरवादी क्र. १ ने दाखल केलेल्या खटल्यातील दुसरा प्रतिवादी होता. उत्तरवादी क्रमांक 1 ने निविदा सादर केली आणि अर्जदाराने 16 मार्च 1970 रोजी उत्तरवादी क्रमांक 2– स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनबरोबर 5,584,200/– अमेरिकन डॉलर्स दराने 492 रेल्वे वॅगन खरेदीसाठी खरेदी करार केला. त्यानंतर 12 ऑगस्ट 1970 रोजी एक वित्तीय करार करण्यात आला. उत्तरवादी क्र. 2 ने उत्तरवादी क्र. 1 सोबत 21 नोव्हेंबर 1970 रोजी मुंबईत झालेल्या एका पाठोपाठ एक कराराद्वारे हा करार करण्यात आला. अर्जदाराने तीन टप्प्यात ह्या रकमेचे प्रदान करायचे होते, म्हणजे एलसीद्वारे 5 टक्के अग्रीम रक्कम म्हणून, शिपमेंटसाठी आणखी 5 टक्के आणि उर्वरित 90 टक्के रक्कम साडेनऊ वर्षांच्या कालावधीत विलंब देय योजनेअंतर्गत व्याजासहित द्यायची होती. सर्व प्रदाने उत्तरवादी क्रमांक 1 च्या बँकेद्वारे करायचे होते आणि यासाठी अर्जदाराने 32 हप्त्यांचा समावेश करण्यासाठी 32 प्रोमिसरी नोट्स जमा केल्या होत्या.

आम्हाला कराराच्या इतर तपशिलात जाण्याची गरज नाही.

1972 मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे रेल्वे वॅगन्सच्या मालवाहतुक शुल्कात वाढ झाली आणि ऑगस्ट 1976 मध्ये 18 ऑगस्ट 1976 रोजीच्या पुरकपत्र क्रमांक 1 द्वारे करारात सुधारणा करण्यात आली, या सुधारणेद्वारे अर्जदाराने पश्चिम आशिया (गल्फ कॉन्फरन्स) किंवा दक्षिण शिपिंग लाईन्स (इराण लाइन्स) सारख्या शिपिंग कंपन्यांच्या अधिकृत मान्यताप्राप्त संस्थांनी प्रमाणित केलेल्या दरांच्या आधारे उत्तरवादी क्रमांक 1 ला मालवाहतूक शुल्क देण्यास सहमती दर्शवली. यापूर्वी पाठवण्यात आलेल्या 306 वॅगनसाठी आणि उर्वरित 186 वॅगनसाठी प्रत्येक वॅगनसाठी 780 अमेरिकन डॉलर्सची रक्कम वगळल्यानंतर मालवाहतूक शुल्क द्यायला अर्जदाराने सहमती दर्शवली.

4. करारात अश्याप्रकारे सुधारणा केल्यानंतर उत्तरवादी क्रमांक 1 ने उत्पादन सुरू ठेवले आणि वॅगनची निर्यात केली. 1973 मध्ये 306 वॅगनसाठी आणि 1977 मध्ये 94 वॅगनसाठी मालवाहतूक शुल्क भरण्यात अर्जदाराला अपयश आल्यामुळे उत्तरवादी क्रमांक 1 चा दावा उद्भवला. सदर दावा 6 सप्टेंबर 1996 रोजी दाखल करण्यात आला होता. अर्जदार कधीही हजर झाला नाही. सन्मा. न्यायमूर्ति डॉ. डी. वाय. चंद्रचूड (त्यावेळेस चे न्यायमूर्ति) यांनी 16 जानेवारी 2008 रोजी पारित केलेल्या न्यायनिर्णयात जो या अपिलात आक्षेपित आहे त्यात इतर गोष्टीं बरोबर अशी नोंद घेतली होती कि (i) अपीलकर्ता जो पहिला प्रतिवादी होता, ज्याच्याविरुद्ध न्यायनिर्णय झाला होता, त्याला रिट समन्स तामिल करण्यात आला होता, (ii) अपीलकर्त्याने हजेरी लावलेली नाही, (iii) प्रतिवादी क्रमांक 1 ने 28 डिसेंबर 1986 रोजी ,C P C 1908 च्या कलम 86 अंतर्गत केंद्र सरकारच्या परवानगीसाठी अर्ज केला आणि 21 मार्च 1996 रोजी परवानगी मिळाली. (iv) 6 सप्टेंबर 1996 रोजी खटला दाखल केला गेला त्यानंतर कलम 86 C P C अंतर्गत परवानगीसाठी अर्ज केल्यावर आणि कलम 15 (2) लिमिटेशन ऍक्ट 1963 च्या तरतुदीनुसार परवानगी मिळाल्याचा कालावधी वगळून, दावा मर्यादित होता. (v) उत्तरवादी क्रमांक 1 ने त्याच्या संचालकाच्या प्रतिज्ञापत्राद्वारे दाखल करण्यात आलेल्या सर–तपासणी आणि रेकॉर्डवर ठेवलेल्या सर्व कागदपत्रांच्या संकलनावर विसंबून असा उल्लेख केला कि अपीलकर्ता रिट समन्सला प्रतिसाद देऊन हजर झाला नाही उत्तरवादी क्रमांक 1 चा दाव्याचे उल्लंघन झाले

नव्हते. (vii) उत्तरवादी क्र. 1 चा दावा त्याच्या साक्षीदाराच्या सर–तपासणी आणि अभिलेखावर सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्याच्या आधारे रीतसर सिद्ध झाला आहे.

(अ) अमेरिकन डॉलर्स 1,387,727.83 म्हणजे 304 वॅगनवर अतिरिक्त मालवाहतूक देयक,(ब) अमेरिकन डॉलर्स 1,696,722.78 म्हणजे 94 वॅगनवरील अतिरिक्त मालवाहतूक देयक, आणि (क) अमेरिकन डॉलर्स 484,840 म्हणजे नुकसानीची रक्कम मंजूर करून न्यायालयाने अर्जदाराच्या विरुद्ध दावा निकाली काढला. मालवाहतुकीच्या दाव्याच्या संदर्भात, न्यायालयाने संबंधित इनव्हाइसच्या तारखांपासून खटल्याच्या तारखेपर्यंत 9 टक्के वार्षिक व्याजदराने रक्कम देण्याचे आदेश दिले होते आणि खटल्याच्या तारखेपासून पेमेंट किंवा परिपूर्ती होईपर्यंत त्याच दराने व्याज मान्य आहे. आणि ते देय होईपर्यंत त्याच दराने व्याज दिले आहे. दाव्याच्या तारखेपासून रक्कम जमा होईपर्यंत वार्षिक 9 टक्के व्याज देण्याचे नुकसान भरपाईचे आदेश न्यायालयाने दिले आहे. खर्चही मंजूर करण्यात आला आहे. राज्य व्यापार महामंडळ उत्तरवादी क्र. 2 यांच्या संदर्भात कोणत्याही सवलतीचा दावा करण्यात आला नाही.

5. विलंब माफी अर्जात वरील तथ्ये सांगितली गेली आहेत कारण रिट समन्स तामील झाला नाही असे अपीलकर्त्याचे म्हणणे होते.

6. विलंबाच्या माफीसाठी हा अर्ज सुमारे 25 फेब्रुवारी 2020 रोजी 12 वर्ष 10 दिवसांच्या विलंबानंतर दाखल करण्यात आला होता.

7. सुमारे 6 डिसेंबर 2022 रोजी कामत यांनी न्यायालयाला सांगितले की, जरी उत्तर तीन महिन्यांपूर्वी देण्यात आले असले तरी, प्रत्युत्तर दाखल करण्यासाठी परवानगी मागितली आहे आणि सदर प्रत्युत्तर अंतरिम अर्जाच्या समर्थनार्थ अतिरिक्त प्रतिज्ञापत्राच्या स्वरूपात असेल ज्यामुळे विलंबाची माफी मागण्यास प्रकरण तयार होईल. खर्च जमा करण्याच्या शर्थीवर परवानगी देण्यात आली. आम्हाला सूचित करण्यात आले आहे की खर्चाची रक्कम देण्यात आली आहे.

8. अर्जदाराने 7 जानेवारी 2023 रोजी अतिरिक्त प्रतिज्ञापत्र दाखल केले. 19 डिसेंबर 2022 रोजी प्रतिज्ञा कथन नसलेली प्रत आगाऊ पाठवण्यात आली आणि त्याला प्रतिसाद म्हणून उत्तरवादी क्र. 1 च्या वतीने उत्तरादाखल अतिरिक्त प्रतिज्ञापत्र 21 डिसेंबर 2022 रोजी दाखल करण्यात आले. त्यामुळे तारखा जुळत नाहीत.

9. कामत यांनी सादर केले कि :

(a) RAI ही सरकारी मालकीची कंपनी आहे. ही काही सरकारची शाखा किंवा संस्था नाही. RAI एक स्वतंत्र कायदेशीर व्यक्तिमत्व आहे आणि इराणी सरकारपासून आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आहे हे इराणच्या रेल्वे (प्रायव्हेट जॉइंट स्टॉक कंपनी) एस्टॅब्लिशमेंट ऍक्ट नुसार स्पष्ट होते आणि आरएआयच्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनने स्पष्ट केले आहे की तिसऱ्या पक्षाने आरएआयविरुद्ध कोणताही दावा जॉइंट स्टॉक कंपनी म्हणून दाखल केला पाहिजे.

(b) 1978 मध्ये इराणी क्रांतीच्या काही काळ आधी, इराणच्या संसदेने 7 मार्च, 1977 रोजी रेल्वे स्थापना कायदा (प्रायव्हेट जॉइंट स्टॉक कंपनी) मंजूर केला आणि हा कायदा 20 सप्टेंबर, 1987 रोजी इराणी क्रांतीनंतर अंमलात आला. ज्या द्वारे आणि ज्या अंतर्गत इराणी राज्य रेल्वे विसर्जित / विघटित करण्यात आली आणि RAI ही प्रायव्हेट जॉईंट स्टॉक कंपनी म्हणून स्थापन करण्यात आली या कायद्यानुसार इराणच्या राज्य रेल्वे आणि रेल्वे बिल्डिंग जनरल डिपार्टमेंटची सर्व मालमत्ता आणि देणी सदर कंपनीला हस्तांतरित करण्यात आली होती.

(c) उत्तरवादी क्रमांक 1 ने 6 सप्टेंबर 1996 रोजी ईरानियन इस्लामिक रिपब्लिक रेल्वेच्या माध्यमातून इस्लामी रिपब्लिक ऑफ इराण (IRI) रेल्वेच्याविरोधात चुकीच्या पद्धतीने दावा दाखल करून मालवाहतूक शुल्क आणि नुकसान भरपाई मागितली. सदर दावा व चुकीने गैरपद्धतीने RAI विरुद्ध दाखल न करता IRI विरुद्ध दाखल करण्यात आला होता परंतु 1987 पासून RAI चे वेगळे अस्तित्व आहे आणी त्यांप्रमाणे उत्तरवादी क्रमांक 1 यांची कारवाई हि IRI विरुद्ध नसून फक्त RAI विरुद्ध असायला हवी होती.

(d) परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने दिलेल्या संमतीवर विश्वास ठेऊन आणि IRI च्या विरोधात कार्यवाही दाखल करणे चुकीचे आहे आणि RAI चालविण्यात आलेला नाही.

(e) या खटल्यातील कागदपत्रे आणि कार्यवाही, RAI वर प्रलंबित असताना किंवा 16 जानेवारी 2008 रोजी एकतर्फी हुकूमनामा पारित झाल्यानंतरही देण्यात आली नव्हती.

(f) उत्तरवादी क्र. १ ने या दाव्यात चेंबर समन्स क्र. 816/2005 दाखल केला होता, मुंबई येथील IRI वाणिज्य दूतावास आणि नवी दिल्ली येथील IRI दूतावासाच्या माध्यमातून अर्जदारावर समन्सची रिट तामील करण्यासाठी चुकीच्या पद्धतीने परवानगी मागितली होती आणि त्यामुळे RAI ला ती तामिल झाली असे समजता येणार नाही कारण त्या कार्यालयांना ते स्वीकारण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नव्हता.

(g) चेंबर समन्स क्रमांक 816/2005 देखील RAI वर तामील करण्यात आला नव्हता आणि त्यामुळे RAI ला या मुद्यावर न्यायालयात म्हणणे मांडण्याची संधी मिळाली नाही.

(h) उत्तरवादी क्र. 1 ने चुकीच्या पद्धतीने पक्षकाराच्या विरोधात दाव्यास कारण नसताना दावा दाखल केला आहे आणि त्यामुळे या न्यायालयाला अधिकारिता नाही.

(i) उत्तरवादि क्रमांक 1 ने RAI नाही तर IRI चे विरुद्ध एकतर्फी हुकूमनामा का अंमलात आणण्यात येऊ नये अश्या प्रकारची नोटीस काढण्याकरीता सी पी सी ऑर्डर XXI रुल 22 अन्वये नोटीस ऑफ मोशन 510/2016 दाखल केली. उत्तरवादी क्र. 1 ने पुन्हा एकदा RAI वर सदर अर्ज निर्देशित आणि तामिल करण्याऐवजी ईराणी इस्लामिक रिपब्लिक रेल्वे मार्फत वाणिज्य दूतावास कार्यालय मुंबई आणि दूतावास कार्यालय नवी दिल्ली माध्यमातून अर्ज पाठवण्याऐवजी चुकीच्या पद्धतीने IRI वर हुकूमनामा पारित केला आणि वाणिज्य दूतावास कार्यालय आणि IRI दूतावासाच्या कार्यालयाला विविध संदेश पाठवण्यात आले.

19 सप्टेंबर 2016 रोजी IRI च्या महावाणिज्य दूतावासाने उत्तरवादी क्र. 1 च्या वकिलांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की दूतावासाला कार्यवाहीची माहिती नाही आणि तो व्यावसायिक संस्था नाही आणि त्याला सार्वभौम संरक्षण आहे. त्यानंतर इराणच्या दूतावासाने 4 ऑक्टोबर 2016 रोजी लिहिलेल्या पत्रात परराष्ट्र मंत्रालयाने योग्य परवानगी दिल्याशिवाय त्यांना नोटीस बजावता येणार नाही अशी भूमिका घेतली होती इतके असूनही RAI ला नोटीस तामिल झाली नाही.

(j) RAI नव्हे तर उत्तरवादी क्रमांक 1 म्हणून IRI च्या विरोधात एकतर्फी हुकूमनामा संदर्भात उत्तरवादी क्रमांक 36 ने 2021 चा व्यावसायिक अंमलबजावणी अर्ज क्रमांक 36 देखील काढून टाकला होता आणि IRI च्या मालमत्तांच्या खुलाशासाठी चेंबर समन्स क्रमांक 523/2019 देखील दाखल केला होता. RAI ला अंमलबजावणी अर्जाची कोणतीही नोटीस नव्हती.

(k) जुलै 2019 मध्ये इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने या प्रकरणातील कागदपत्रे आणि कार्यवाही RAI कडे पाठवली तेव्हा RAI ला कार्यवाहीची माहिती मिळाली आणि RAI ला त्यांच्या बचावासाठी वकिल नेमावे लागले. ही बाब 23 वर्षे जुनी असल्यामुळे आणि भारतीय कायद्यावर आधारित असल्यामुळे इंग्रजीत दाखल करण्यात आली होती. प्रमाणित प्रती मिळाल्यानंतर हा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

(l) RAI ला जुलै 2019 पूर्वी कोणत्याही वेळी प्रस्तुत अपील आणि अर्ज दाखल करता आला नव्हता. एकतर्फी हुकूमनामा कार्यवाहीची अखेरीस माहिती मिळाल्यानंतरच, सुमारे 12 वर्षांनंतर, हा अर्ज दाखल करण्यात आला.

10. कामत यांनी सर्वोच्च न्यायालयाचा **मदनलाल –विरुद्ध– उत्तर प्रदेश राज्य आणि इतर** प्रकरणातील निकालावर अवलंबून राहून सांगितले की,[1] जर व्यथित पक्षाला आदेशाची माहिती आदेशातून अपील सादर करण्यासाठी निर्धारित मुदत संपल्यानंतर मिळाली तर त्याची चूक नसल्यामुळे त्याला दाद मागण्याचा हक्क हिरावून घेता येत नाही. एखाद्या आदेशामुळे ज्याच्या अधिकारांवर परिणाम झाला आहे अशा पक्षाला त्याची जाणीव असणे हे नैसर्गिक न्यायाचे मूलभूत तत्व आहे. निवाड्यामुळे प्रभावित झालेल्या पक्षाचे ज्ञान, एकतर वास्तविक किंवा रचनात्मक, निष्पक्ष आणि नैसर्गिक न्यायाची अत्यावश्यक आवश्यकता असल्याने "निवाड्याची तारीख" याचा अर्थ एकतर वास्तविक किंवा रचनात्मक असा असावा की जेव्हा ऑर्डर पक्षाला कळविला गेला असेल किंवा त्याला कळले असेल. त्यामुळे RAI ला जुलै 2019 मध्येच या आदेशाची माहिती देण्यात आली होती आणि त्या तारखेपासूनच या आदेशाची मोजणी करणे आवश्यक आहे म्हणूनच, RAI ला जुलै 2019

1

मध्ये आक्षेपित न्यायनिर्णय माहिती मिळाली आणि 25 फेब्रुवारी 2020 रोजी अंतरिम अर्ज व याचिका दाखल करण्यात आली, त्यामुळे जास्तीत जास्त विलंब केवळ आठ महिन्यांचा आहे.

11. कामत यांनी असेही सादर केले की उत्तरवादी क्रमांक 1 हा सत्य कथन करीत आहे कारण प्रतिवादी क्रमांक 1 ने वादपत्रात खुलासा केला नाही की रेल्वे वॅगनच्या पुरवठ्याचे करार इराणी न्यायालयांच्या विशेष अधिकारक्षेत्राअंतर्गत प्रदान केले गेले होते आणि जर वादपत्रात खुलासा केला असता की कराराने इराणी न्यायालयांच्या विशेष अधिकार क्षेत्राची तरतूद केली होती, तर न्यायालयाने खटला स्वीकारला नसता आणि कोणताही हुकूमनामा पारित केला नसता.

12. **अरुणोदय सिंग – विरुद्ध – ली ऍनी एल्टोन**[2] या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निकालाचा आधार घेत कामत यांनी असेही नमूद केले की जेव्हा मर्यादेच्या आधारावर स्पष्टपणे गुणवत्तेच्या आधारावर अपील नाकारले जाते तेव्हा विलंबाच्या माफीच्या अर्जावर न्यायनिर्णय घेताना न्यायालयांना उदार दृष्टीकोन घेण्याचा अधिकार आहे.

13. थोडक्यात सांगायचे तर कामत यांचे प्रकरण पूर्णपणे या आधारावर होते की RAI च्या वतीने अर्ज केला आहे आणि उत्तरवादी क्रमांक 1 ने ने RAI विरुद्ध दावा करायला पाहिजे होता न कि IRI वर. त्यांनी IRI पासून स्वतःला पूर्णपणे दूर ठेवले.

RAI च्या विरोधात कोणताही हुकूमनामा नाही हे मान्य आहे.

14. श्री. जगतियानी यांनी सादर केलेले निवेदन खालीलप्रमाणेः

(a) सुरुवातीला RAI ला हजर राहण्याचा न्यायनिर्णय नव्हता कारण RAI न्यायनिर्णित ऋणको नाही. RAI अर्जदार किंवा अपीलकर्ता देखील नाही, परंतु 7 जानेवारी 2023 रोजी अतिरिक्त प्रतिज्ञापत्र दाखल केल्यानंतर तो हजर झाला आहे.

(b) अर्जदार 12 वर्षांहून अधिक कालावधीनंतर या न्यायालयात धाव घेऊन कायदेशीर प्रक्रियेचा गैरवापर करत आहे.

(c) अर्जाच्या परिच्छेद 11 मध्ये, अर्जदाराने (IRI) म्हटले आहे की, मार्च 2019 च्या पहिल्या आठवड्यात अंमलबजावणी प्रक्रियेची माहिती मिळाली होती, परंतु दुसऱ्याने दाखल केलेल्या अतिरिक्त प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, याची माहिती जुलै 2019 मध्ये मिळाली.हा विरोधाभास अगदी स्पष्ट आहे आणि अर्ज रद्द करण्याची आवश्यकता आहे.

(d) उत्तरवादी क्रमांक 1 च्या वतीने IRI ने 19 सप्टेंबर 2016 रोजी मुंबईतील वाणिज्य दूतावासामार्फत जारी केलेल्या पत्राद्वारे मार्च 2019 किंवा जुलै 2019 मधील तथाकथित माहिती खोटी ठरविली आहे.

(e) इराणच्या तेहरान येथील इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण– IRI या इस्लामी रिपब्लिकद्वारे 27 जून 1997, 22 ऑगस्ट 2000 आणि 1 ऑगस्ट 2003 रोजी मुंबईच्या शेरिफ कार्यालयाच्या माध्यमातून अर्जदाराला तीन वेळा तामिली देण्याचा प्रयत्न केला. ही तामिली अपयशी ठरल्यामुळे, उत्तरवादी क्र. 1 ने अर्जदाराच्या मुंबई येथील वाणिज्य दूतावास आणि नवी दिल्ली येथील दूतावासाच्या माध्यमातून रिट समन्सची तामिली लागू करण्यासाठी परवानगी मागितली. त्याप्रमाणे 26 सप्टेंबर 2005 च्या आदेशानुसार चेंबर समन्स क्र. 816/2005 मान्य करण्यात आला आणि त्यानुसार उत्तरवादी क्रमांक 1 ने मुंबई येथील वाणिज्य दूतावास आणि नवी दिल्ली येथील दूतावासाच्या माध्यमातून अर्जदाराला रीट समन्स बजावले. या समन्स सर्व्हिसला या आक्षेपित निकालात मान्यता दिली आहे.

(f) उत्तरवादी क्रमांक 1 ने सीपीसीच्या ऑर्डर XXI रुल 22 अंतर्गत च्या नोटीस ऑफ मोशन क्रमांक 510/2016 ची नोटीस दाखल केली आणि न्यायनिर्णय आणि हुकूमनामा अंमलात आणण्यासाठी परवानगी मागितली. मुंबईतील अर्जदाराच्या दूतावासाला 9 फेब्रुवारी 2016 रोजी लिहिलेल्या पत्राद्वारे उत्तरवादी क्रमांक 1 ने नोटीस ऑफ मोशनची प्रत पाठवली. त्यानंतर उत्तरवादी क्र. 1 ने अनेक पत्रे लिहून अर्जदाराला 2016 च्या चेंबर समन्स क्र. 510 मध्ये या न्यायालयासमोरील कार्यवाहीची माहिती दिली, तरीही अर्जदार

हजर झाला नाही. उत्तरवादी क्रमांक 1 च्या वकिलांनी अर्जदारांना न्यायालयात हजर राहण्याचे आवाहन करणारे पत्र मुंबई वाणिज्य दूतावासाच्या कार्यालयात पाठवले होते. या अर्जाला पहिल्यांदाच 19 सप्टेंबर 2016 च्या पत्रात उत्तर देण्यात आले आहे.

(g) त्यानंतर अर्जदाराला सांगण्यात आले की नोटीस ऑफ मोशन क्रमांक 510/2016 28/29 सप्टेंबर 2016 रोजी न्यायालयाकडून घेतली जाईल, परंतु अर्जदाराला डिप्लोमॅटिक इम्युनिटी नमूद असल्याचे पत्र स्वीकारण्यात आले नाही.

(h) अर्जदार न्यायालयात कधीही हजर झाला नाही, त्यामुळे न्यायालयाने 7 मार्च 2018 रोजी दिलेल्या आदेशात नमूद केले आहे –

> "2.... .. हा प्रस्ताव प्रतिवादींवर योग्यरित्या तामील करण्यात आला आहे. वादीने तीन प्रतिज्ञापत्रे सादर केली आहेत. या तामील केल्याचा पुरावा म्हणून 11 एप्रिल 2016 आणि 19 सप्टेंबर 2016 रोजी सादर केलेल्या पहिल्या दोन प्रतिज्ञापत्रांमधून असे सूचित होते की ही तामिली प्रतिवादींनी इराणच्या वाणिज्य दूतावासाच्या माध्यमातून स्वीकारली होती. 7 मार्च 2018 रोजी सादर करण्यात आलेल्या तिसऱ्या प्रतिज्ञापत्रात असे नमूद करण्यात आले आहे की, जेव्हा प्रतिवादींना इस्लामिक रिपब्लिक इराणच्या दूतावासाच्या माध्यमातून नोटीस ऑफ मोशनची विशेष नोटीस देण्यात आली होती. 7 मार्च 2018 रोजी दाखल करण्यात आलेल्या तिसऱ्या प्रतिज्ञापत्रात असे नमूद करण्यात आले आहे की, जेव्हा प्रतिवादींना वाणिज्य दूतावासाच्या माध्यमातून नोटीस ऑफ मोशनची विशेष नोटीस पाठवण्याची मागणी करण्यात आली होती' तेव्हा ही नोटीस स्वीकारण्यास दूतावासाने नकार दिला होता. त्यानंतर ही नोटीस ईमेलद्वारे वाणिज्य दूतावासालाही पाठवण्यात आली.
>
> ३... ... या न्यायालयाने यापूर्वी 26 सप्टेंबर 2005 रोजी पारित केलेल्या आदेशानुसार, दूतावासाच्या माध्यमातून प्रतिवादींना रिट समन्स बजावण्याची परवानगी देण्यात आली होती. दुतावास कार्यालयाने दाव्यातील नोटीस ऑफ प्रोसिडिंग्स आणि त्यातील एक्सिक्युशन प्रोसिडिंग्स मान्य केले, वरील तीन प्रतिज्ञापत्र समन्स तामील नाकारल्याचे नमूद केले आहे. या संदर्भात, प्रतिवादींविरोधात नोटीस ऑफ मोशनच, तामिली पूर्ण मानली

पाहिजे. प्रतिवादी अनुपस्थित आहेत आणि कोणतेही कारण दाखविले नाही."

(i) त्यानंतर उत्तरवादी क्रमांक 1 ने निकाल आणि न्यायनिर्णय अंमलबजावणीसाठी कमर्शियल अंमलबजावणी अर्ज क्रमांक 36 /2021 दाखल केला. उत्तरवादी क्र. 1 ने उपरोक्त अंमलबजावणी अर्जात, अर्जदाराची मालमत्ता जप्त करण्यासाठी कमर्शियल चेंबर समन्स क्र. 523/2019 दाखल केला. 28 फेब्रुवारी 2019 रोजी अर्जदाराला मुंबईतील वाणिज्य दूतावासाच्या कार्यालयात तामील करण्यात आला. चेंबर समन्स क्र. 523/2019 च्या सुनावणीला उपस्थित राहून प्रथमच अर्जदाराच्या वकिलांनी हजेरी लावली. अर्जदाराने 4 जानेवारी 2020 रोजी मोहम्मद रेजा इब्राहिमी यांचे प्रतिज्ञाकथन न केलेले परंतु स्वाक्षरी केलेले प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. या न्यायालयाने, 22 जानेवारी 2020 रोजी अंमलबजावणी अर्जातील चेंबर समन्स क्रमांक 523/2019 मध्ये दिलेल्या आदेशानुसार अर्जदाराला आदेशानंतर चार आठवड्यांच्या आत भारतातील व्यावसायिक मालमत्ता आणि व्यवहारांची माहिती देण्याचे निर्देश दिले होते. हा खुलासा करण्याचा आदेश दिल्यानंतरच, अर्जदाराने विलंब माफ करण्यासाठी अंतरिम अर्जासह अपील दाखल करून या न्यायालयाकडे संपर्क साधला आहे.

(j) अर्जदार इराणी सरकार म्हणजेच इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण (IRI) आहे, आरएआय नाही. ही एक नवीन कथा आहे जी RAI ने प्रसारित केली आहे आणि RIR इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण नाही. सारांशमध्ये कारण शीर्षकात म्हटले आहे, "इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण...... अपीलकर्ता/मूळ प्रतिवादी क्र.१ चे सारांशच्या परिच्छेद वाचन खालील प्रमाणे आहे.

> "1. 16 जानेवारी 2008 रोजी फॉरेन स्टेट विरुद्ध पारित केलेल्या एकतर्फी हुकूमनाम्याला अपीलकर्त्याने आव्हान दिले आहे. सी पी सी कलम 86 अंतर्गत दिलेली मंजुरी हि इराणी रेल्वेच्या विरोधात आहे परंतु वादी कोणत्याही आधाराशिवाय इराण सरकारच्या विरोधात दावा दाखल केला. वादीने नियमांनुसार समन्स पाठवले नाहीत आणि फॉरेन स्टेटला समन्स तामील करण्याकरिता कायद्यात स्थापित निर्धारित प्रक्रिया दर्शविली नाही "

म्हणूनच, अर्जदाराने हे मान्य केले आहे की एक्स–पार्टी हुकूमनामा अर्जदाराच्या विरोधात आहे जो एक फॉरेन स्टेट आहे आणि RAI नाही. अर्जदार हा इराण सरकार आणि फॉरेन स्टेट आहे.

(k) प्रतिज्ञाकथन न करता दिलेल्या अतिरिक्त प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद 6 (a) मध्ये, अर्जदाराने नमूद केले आहे की हा हुकूमनामा इराण सरकारच्या विरोधात असल्यामुळे तो प्रकटन आदेशाचे पालन करू शकत नाही. अंतरिम अर्ज क्रमांक 1628/2020 च्या 7 व्या परिच्छेदात अर्जदाराने रेल्वे वॅगनच्या पुरवठ्यासाठी भारत सरकारशी करार केल्याची कबुली दिली आहे.

(l) प्रतिज्ञाकथन न करता दिलेल्या अतिरिक्त प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद 7 (a) मध्ये इराण सरकारने जागतिक निविदा काढल्याचा उल्लेख आहे. 1626 आणि 1627 या अंतरिम अर्जाच्या परिच्छेद 3 मध्ये अर्जदाराने म्हटले आहे की जागतिक निविदा इराण रेल्वेने काढल्या होत्या.

(m) इराण रेल्वे ही स्वतंत्र कायदेशीर संस्था आहे हे मान्य न करता, इराण सरकारच्या रस्ते आणि शहरी वाहतूक मंत्रालयाच्या देखरेखीखाली इराण रेल्वे आहे. इराण सरकारच्या रस्ते आणि शहरी वाहतूक मंत्रालयाच्या प्रस्तावानुसार इराण रेल्वे संघटना आणि त्यात कोणताही बदल इराण सरकारकडून पारित केल्या जातात. इराण रेल्वेचे सर्व शेयर्स इराण सरकारच्या मालकीचे आहेत. इराण रेल्वेच्या विविध विभागातील व्यक्ती इराण सरकारचे मंत्री आहेत आणि/किंवा इराण सरकारच्या मंत्र्यांनी निवडून दिलेल्या व्यक्ती आहेत. इराण सरकारच्या 1979 च्या संविधानानुसार रेल्वे ही सार्वजनिक मालमत्ता असून ती इराण सरकारच्या ताब्यात आहे. 2018 साली इराण सरकारने आपल्या रेल्वे मंत्रालयाच्या माध्यमातून इराण रेल्वेच्या वतीने रेल्वेशी संबंधित इतर कंपन्यांबरोबर विशेषतः भारत सरकारबरोबर रेल्वे क्षेत्रात सहकार्यासाठी 2 अब्ज अमेरिकी डॉलर्सपेक्षा जास्त मूल्याच्या विविध करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. त्यामुळे हा अंतरिम अर्ज भरीव खर्चासह फेटाळण्यात यावा.

15. पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि प्रतिज्ञापत्रांचा विचार केल्यानंतर आमच्या मते हा अर्ज कायम करण्या योग्य नाही. सर्वप्रथम, अर्जात विलंबाचे कोणतेही

स्वीकार करण्याजोगे स्पष्टीकरण नाही आणि अर्जदारासाठी कोणीही हजर झाले नाही. पुढे हे स्पष्ट आहे की, उत्तरवादी क्र. 1 ने या न्यायालयाने अनुमती प्रदान केल्याच्या अनुषंगाने अर्जदाराला त्याच्या मुंबई येथील वाणिज्य दूतावास आणि दिल्लीतील दूतावासाच्या माध्यमातून रीट समन्स बजावले होते. एकतर्फी हुकूमनाम्यात न्यायालयाने ही चांगली तामिली असल्याचे मान्य केले आहे. अशा प्रकारचा खटला दाखल केला जात असल्याची माहिती असूनही IRI ने या न्यायालयाच्या आदेशांची आणि निर्णयांची कोणतीही दखल घेतली नाही. न्यायालयाने अर्जदाराला आपली मालमत्ता उघड करण्याचे निर्देश या कारणास्तव देईपर्यंत त्यांनी कोणतीही पावले उचलली नाहीत.

16. IRI ने विलंब माफ करण्यासाठी केलेल्या अर्जासह अपील दाखल करण्यात आले आहे, त्याव्यतिरिक्त अन्य कोणीही नाही. कारण "इराणी इस्लामिक रिपब्लिक रेल्वे, तेहरान, इराण" असे शीर्षक लिहिले आहे याचा अर्थ केवळ "द्वारा" असा आहे आणि असा पत्ता किंवा चालू ठेवणे ज्यामार्फत इस्लामी प्रजासत्ताक इराणवर खटला चालवला जात आहे. खरं तर, अर्जदार म्हणजेच IRI ने देखील ही भूमिका स्वीकारली आहे आणि अर्जदाराने (IRI) अपीलकर्ता स्टेटविरुद्ध एकतर्फी निर्णयाला आव्हान देणाऱ्या घटनांच्या सारांश आणि तारखांमध्ये नमूद केलेल्या आव्हानात, उत्तरवादी क्रमांक 1 ने कोणत्याही आधाराशिवाय इराण सरकारच्या विरोधात खटला दाखल केला आहे आणि उत्तरवादी क्रमांक 1 ने नियमानुसार समन्सची पूर्तता केली नाही आणि परदेशात सेवा देण्यासाठी हुकूमनामा प्रक्रिया केली आहे. अपील कराराशी संलग्न केलेल्या निवेदनातही अर्जदाराने नमूद केले आहे की:

> "S. विद्वान ट्रायल कोर्ट हे स्वीकारण्यास अपयशी ठरले आहे की संबंधित खटल्यातील पक्षकाराला थेट समन्स पाठवणे प्रतिबंधित आहे आणि सीपीसीच्या ऑर्डर 5 रुल 26 अंतर्गत परराष्ट्र मंत्रालयामार्फत हे समन्स पाठवावे लागतात.
>
> V. विद्वान ट्रायल कोर्ट हे स्वीकारण्यास अपयशी ठरले आहे की फॉरेन स्टेट स्वतः एकपक्ष बनल्यास त्या बाबतीत सार्वभौम सवलत दिली जाते.
>
> W. विद्वान ट्रायल कोर्ट हे स्वीकारण्यास अपयशी ठरले आहे की भारत सरकारने 12 जानेवारी 2007 रोजी युनाइटेड नेशन्स कन्व्हेंशन

ऑन जुरिसडिक्शनल इम्युनिटीज ऑफ स्टेट्स अँड देयर प्रॉपर्टी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

त्यामुळे अर्जदार इराण सरकारचा आहे. एकतर्फी हुकूमनामा इराण सरकार विरुद्ध असून RAI च्या नाही. समर्थनार्थ असलेल्या अतिरिक्त प्रतिज्ञापत्रात इराणचे सरकार RAI मार्फत वेगळी आणि वेगळी भूमिका घेत आहे की RAI ही एक वेगळी कायदेशीर संस्था आहे आणि तिच्या स्वतःच्या नावाने दावा करावा लागेल. समर्थनार्थ RAI च्या माध्यमातून वेगळी आणि वेगळी भूमिका घेत आहे की RAI ही एक वेगळी कायदेशीर संस्था आहे आणि तिच्याविरोधात स्वतःच्या नावाने दावा चालवावा लागेल. अपिलच्या परिच्छेद 2 (dd) मध्ये याचिकाकर्त्यांने म्हटले आहे की प्रतिवादी क्रमांक 1 हा इराण रेल्वे आहे ज्याने खरेदी करारावर स्वाक्षरी केली आहे. तथापि, अपील मेमोच्या सारांशमध्ये, अर्जदाराने म्हटले आहे की IRI म्हणजेच इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणने खरेदी करारावर स्वाक्षरी केली आहे.

17. कामत यांनी **कतार एअरवेज – विरुद्ध –शापूरजी पालोनजी अँड कंपनी**[3] या दाव्यात ह्या उच्चन्यायालयाच्या द्वि सदस्सीय न्यायमूर्तींनी दिलेल्या निर्णयावर भर दिला की जरी राज्याच्या मालकीची 100% संस्था असली तरी, कॉर्पोरेट घटकाचे वेगळे न्यायिक व्यक्तिमत्व असते आणि हे व्यक्तिमत्व ज्यांच्याकडे भाग भांडवल आहे त्यांच्यापेक्षा वेगळे असते. कायद्यांतर्गत अंतर्भूत केलेल्या कॉर्पोरेट घटकाचे स्वतःचे न्यायिक व्यक्तिमत्त्व असते हे एक मान्यताप्राप्त तत्त्व आहे. कॉर्पोरेशनद्वारे चालवलेली व्यापार प्रक्रिया हा राज्याद्वारे विभागीयरित्या केला जाणारा व्यापार नाही किंवा त्या वतीने नियुक्त केलेल्या एजंट्सद्वारे राज्याने चालविलेली व्यापार प्रक्रिया नाही. कामत यांच्या या निवेदनावर कोणताही वाद असू शकत नाही, परंतु सत्य हे आहे की, IRI आणि RAI स्वतंत्र संस्था म्हणून नाही ज्यांनी अर्ज किंवा अपील केले आहे. कामत यांनी सादर केल्याप्रमाणे एखाद्या कॉर्पोरेट संस्थेचे वेगळे आणि वेगळे व्यक्तिमत्व आहे या तत्वांचा अवलंब करायचा असेल तर आपल्याला वर उद्धृत केलेल्या आधारावर (S), (V) आणि (W) मध्ये गुणवत्ता आढळत नाही. अशी स्वतंत्र संस्था सार्वभौम उन्मुक्ततेचा दावा करू शकत नाही.

18. या प्रक्रियेत इराण सरकार नाही तर इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण रेल्वे (IRI) सहभागी होत आहे, असे अर्जदाराने विलंबाने आणि नंतर विचार करून स्वीकारले आहे. कमर्शियल चेंबर समन्स क्रमांक 523/ 2019 मधील या न्यायालयासमोर नमूद केलेल्या भूमिकेच्या हे विरुद्ध आहे. व्यावसायिक अंमलबजावणी अर्जातील चेंबर समन्स क्र. 523/2019 च्या सुनावणीमध्ये इराणी सरकार सहभागी होते हे विद्वान एकल न्यायाधीशांच्या 22 जानेवारी 2020 च्या आदेशाच्या परिच्छेद 3 आणि 8 वरून स्पष्ट होते कि अर्जदाराने त्यांची मत्ता जाहीर करावी . या अंतरिम अर्जासह S, V आणि W आणि अर्जदाराने दाखल केलेला दुसरा अंतरिम अर्ज क्र. 1627/2020 या कारणास्तव, अर्जदाराने अपीलमध्ये घेतलेला भावार्थ आणि स्थिती हि फॉरेन स्टेट म्हणजेच इराण सरकार आहे. प्रत्यक्षात IRI किंवा RAI नसल्याचा याचिकाकर्त्याचा युक्तिवाद अपिलात आहे आणि अतिरिक्त प्रतिज्ञापत्राच्या माध्यमातून ही नवीन भूमिका घेतली जात आहे. अर्जदाराने दाखल केलेला अंतरिम अर्ज क्रमांक 1628 /2020 देखील फॉरेन स्टेट क्षमतेत आहे. इराणचे अधिकृत प्रतिनिधी मोहम्मद रेझा इब्राहिमी यांच्या स्वाक्षऱ्या असलेल्या या अर्जाच्या मुद्द्यांची पार्श्वभूमी 4 (c), 4 (d), 4 (e), 4 (f), 4 (t) आणि परिच्छेद 7 अशी आहे जी IRIR किंवा RAI नसून फॉरेन स्टेट आहे.

19. प्रकटन आदेशांतर्गत अर्जदाराने आपली मालमत्ता जाहीर करावी असे न्यायालयाने निर्देश दिल्यानंतरही तीन अंतरिम अर्जांसह अपील दाखल करण्यात आले, तेव्हा अतिरिक्त प्रतिज्ञापत्रासह आस्थापना कायदा आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशनसारख्या अतिरिक्त कागदपत्रे सादर न करण्याची निवड अर्जदाराने केली. ही कागदपत्रे सादर करण्यासाठी तीन वर्षांहून अधिक विलंब झाला आहे आणि अर्जदाराच्या भूमिकेतील बदलाचे कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. अर्जदाराने IRIR किंवा RAI ला स्वतःहून वेगळे करण्याचा प्रयत्न करणे हे धूळ फेक आहे, असे आम्ही मानतो. उत्तरवादी क्रमांक 1 ने परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाला 28 डिसेंबर 1986 रोजी लिहिलेल्या पत्रात इराण सरकार आणि इराणी रेल्वे यांच्यात कोणतेही विभाजन नाही या आधारावर इराण सरकारवर खटला चालवण्याची परवानगी मागितली होती. जुलै 2019 मध्ये या न्यायालयासमोर कार्यवाहीची माहिती असूनही RAI/ IRIR च्या संदर्भात अर्जदाराने या विलंबाने युक्तिवाद करण्यास झालेल्या

विलंबाचे स्पष्टीकरण दिलेले नाही. वस्तुतः अर्जदाराने IRIR किंवा RAI ऐवजी इराणी सरकार म्हणून चेंबर समन्स क्रमांक 523/2019 च्या मध्ये भाग घेताना युक्तिवाद केला. इराणी सरकार आणि IRIR /RAI या शब्दांचा आमच्या मते या न्यायालयाची दिशाभूल करण्याच्या प्रयत्नात खोडसाळपने अदलाबदल केली जात आहे. केंद्र सरकारने 26 सप्टेंबर 2018 रोजी जारी केलेल्या पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे की IRIR हा इराण सरकारचा एक भाग आहे आणि न्यायनिर्णय आणि हुकूमनामा लागू करण्याची परवानगी देतो. दावा चालवण्यासाठी केंद्र सरकारने दिलेली संमती न्यायालयासमोर मांडण्यात आली आणि अभिलेखावर असलेले पुरावे विचारात घेऊन न्यायालयाने हे मान्य केले की हा दावा इराणी सरकारच्या विरोधात योग्यरित्या दाखल करण्यात आला आहे. मार्च/जुलै 2019 पासून कार्यवाहीची माहिती स्वीकारल्यानंतर आणि चेंबर समन्स क्रमांक 523/ 2019 मध्ये न्यायालयासमोर झालेल्या कार्यवाहीमध्ये सक्रीय सहभाग घेतल्यानंतर, अर्जदार उशिराने तामिली योग्य रित्या नसल्याचा युक्तिवाद करू शकत नाही. दस्तावेजी पुरावा सादर करण्यास विलंब किंवा इराणी सरकार आणि इराणी रेल्वे यांच्यात कायदेशीर अस्तित्व वेगळे करण्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. आमच्या मते, ज्यांच्याविरुद्ध वादास कारण उद्भवले आणि ज्यांच्याविरुद्ध न्यायनिर्णय आणि हुकूमनामा पारित झाले त्या इराण सरकारची जबाबदारी उत्तरवादि क्रमांक 1 अभिप्रतीत हितसंबधातील पूर्वाधिकारी किंवा हितसंबधातील उत्तराधिकारी म्हणून सूचित करण्याची होती, अशी कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

20. आम्ही असे निरीक्षण केले कि इराणी सरकारने या न्यायालयासमोर हजर न होण्याचा निर्णय घेतला आहे आणि आताही न्यायालयाच्या आदेशांचे पालन करण्यास नकार दिला आहे. अशा प्रकारे, एका बाजूला अर्जदाराने संबंधित प्रकरणांमध्ये सांगितले आहे की IRIR ने या न्यायालयासमोर कार्यवाहीमध्ये भाग घेतला होता ज्यामुळे प्रकटन आदेश पारित झाला आणि दुसरीकडे तो सादर करतो की प्रकटन आदेश इराणी सरकारच्या विरोधात होता. अर्जदाराने अंतरिम अर्ज क्रमांक 1628/ 2020 मध्ये रेल्वेच्या वॅगन आणि उपकरणांच्या पुरवठ्यासाठी भारत सरकारबरोबर करारावर स्वाक्षऱ्या केल्याची कबुली दिली होती जे वर्तमानपत्रात प्रकाशित झाले होते. अर्जदाराने या न्यायालयासमोर कोणतेही

निवेदन केलेले नाही, परंतु केवळ RAI, जो अपिलात एक पक्षकार देखील नाही, त्यानेच न्यायालयात हजर राहण्यासाठी अधिवक्ता नियुक्त केला आहे. या कारणास्तव अंतरिम अर्जासह अपील गैर–अभियोजन म्हणून रद्द केले पाहिजे.

21. कामत यांनी मांडलेल्या विशेष अधिकार क्षेत्र क्षेत्राधिकाराच्या कलमाचा खुलासा न करण्याच्या मुद्यावर, आमच्या मते, प्रत्येक याचिकेत केवळ सीपीसीच्या ऑर्डर VI रुल 2 अंतर्गत सी पी सी कायद्यानुसार ज्या तथ्यांवर संबंधित पक्ष विश्वास ठेवतो त्या तथ्यांचा संक्षिप्त स्वरुपात समावेश असावा. त्याचप्रमाणे, आपला बचाव ज्या वस्तुस्थितीवर आधारित आहे ती वस्तुस्थिती प्रतिवादीने मांडणे आवश्यक आहे. श्री जागतीयानी ह्यांनी विश्वास दर्शविलेल्या **मयार (एच.के.) लिमिटेड आणि अन्य –विरुद्ध – मालक आणि पक्ष, एम. व्ही. फॉर्च्युन एक्स्प्रेस आणि इतरांच्या**[4] खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार, "तात्विक वस्तुस्थिती" या वाक्याची व्याख्या कुठेही करण्यात आलेली नाही. परंतु सी पी सी च्या ऑर्डर 6 रूल 2 मध्ये जे शब्द आहेत त्या नुसार ज्या तथ्यांवर पक्ष त्याच्या बचावाच्या दाव्या करीता अवलंबून असतो आणि लेखी निवेदनात वादी किंवा प्रतिवादीच्या बचावासाठी दावा केलेल्या फिर्यादीचा हक्क सिद्ध करण्यासाठी तथ्ये सिद्ध केली पाहिजेत. कोणती विशिष्ट वस्तुस्थिती ही वस्तुस्थिती आहे आणि कोणत्या पक्षाने ती मांडणे आवश्यक आहे, हे प्रत्येक प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थितीवर अवलंबून असेल. दाव्यास, कारणाच्या हेतूसाठी उत्तरवादी क्र. 1 ने या न्यायालयाचे अधिकार क्षेत्र काढून घेण्याची मागणी करणे आवश्यक नव्हते. लेटर्स पेटेंटच्या कलम 12 अंतर्गत उत्तरवादी क्र. 1 ने परवानगी घेतली होती आणि परवानगी दिल्या नंतर हा दावा दाखल केला. न्यायालयाचे समाधान झाले आणि आधी नमूद केल्याप्रमाणे मुंबई येथील इराणी वाणिज्य दूतावास आणि नवी दिल्ली येथील दूतावासाला तामिली करण्यासाठी परवानगी मंजूर करण्यात आली. न्यायालयाने एकतर्फी हुकूमनामा दिला. आमच्या दृष्टीने, अर्जदाराने न्यायालयात यायला हवे होते आणि अनन्य खंड असल्याचे न्यायालयाला कळवायला हवे होते. या प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थिती लक्षात घेता, युक्तिवादामध्ये अनन्य अधिकारिता खंडाचा संदर्भ न देणे म्हणजे वस्तुस्थिती दडपणे असे म्हणता येणार नाही.

**22.** आम्ही केलेल्या वरील टिप्पण्या लक्षात घेता अंतरिम अर्ज कायम ठेवता येण्या सारखा नाही. 12 वर्षे 10 दिवस विलंबाचे कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण नाही. त्यामुळे उत्तरवादी क्रमांक 1 ला 4 आठवड्यांच्या आत 10,00,000/- रुपये (दहा लाख रुपये) खर्चाची रक्कम देण्यासह अर्ज फेटाळला जातो. रकमेचे प्रदान उत्तरवादी क्र. 1 च्या वकिला मार्फत करण्यात यावे .

23. परिणामतः अपील सुद्धा खारीज करण्यात येते.

**(न्यायमूर्ति राजेश एस. पाटील )** **(न्यायमूर्ति के. आर. श्रीराम )**

## अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल."

**न्यायनिर्णयांची सूचि :-**

१) मदनलाल -विरुद्ध- स्टेट ऑफ यू पी अँड अदर्स 1975 2 S C C 779.

२) अरुणोदयसिंग -विरुद्ध- ली ऍनी एल्टन 2021 SCC online S C C 3285.

३) कतार एयरवेज -विरुद्ध- शापोरीजी पालोनजी अँड कंपनी 2013 (3) Mh L J 323.

४) मयर (एच. के.) लिमिटेड अँड अदर्स -विरुद्ध- ओनर्स अँड पार्टीज, व्हेसल एम. व्ही फॉरचुन एक्सप्रेस अँड अदर्स 2006 (3 SCC ) 100.